(भु.मा.क्र.१/अ-६५/२०१६-२०१७, गाव : गोंदिया खुर्द, तहसिल :- गोंदिया, जिल्हा गोंदिया)

<u>अधिसुचना</u>

क्र.जिल्हा./भुसंपादन/अका/कावि/ ८ /२०१७
जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया.
दिनांक :- ८/०८/२०१७

## भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम १९ (१) खालील अधिसुचना

**ज्याअर्थी**, समुचित शासन असलेल्या गोंदिया जिल्हयाच्या जिल्हाधिका-यांनी भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) यांच्या **कलम ११ च्या पोट कलम (१)** व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसुचना **क्र.उविअगो/अका/प्रस्तु-३/कावि-३७१/२०१७ दिनांक २४/३/२०१७** ला काढली आहे आणि महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ३०/०३/२०१७ मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमीनीचे, अनुसुची दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनीक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, गोंदिया (जिल्हाच्या) जिल्हाधिका-यांनी, उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, गोंदिया यांचेकडून करण्यात आलेल्या **कलम १५ च्या पोटकलम (२)** अन्वये दिलेला चौकशी अहवाल प्राप्त केल्यावर उक्त जमीन शासकिय मालकिचे **"गोंदिया शहराच्या पुर्व वळण रस्त्याचे बांधकाम"** या सार्वजनीक कामासाठी आवश्यक आहे असे प्रतिपादीत केलेले आहे. आणि हा अहवाल विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबतची खात्री पटली आहे.

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या **कलम १९ च्या पोटकलम (१)** च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसुची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कूटूंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणुन निरंक असल्याचे निर्धारीत केले असल्याचे याव्दारे घोषित करण्यात येत असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसुची चार मध्ये सुध्दा निरंक असल्याचे विनिर्दिष्ट केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्य पार पाडण्यासाठी **उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी गोंदिया यास पदनिर्देशित करीत आहे.**

## अनुसुची - एक

(भुसंपादन करावयाचे जमिनीचे वर्णन)

मौजा - गोंदिया खुर्द तह. गोंदिया

| अनु.क्र. | सर्वे क्र. | संपादनाखालील अंदाजीत क्षेत्र |
|---|---|---|
| १ | १०/३ | ०.२१ |
| एकुण अदमासे क्षेत्र | | ०.२१ |

## अनुसुची - दोन

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव** :- गोंदिया शहराचा पुर्व वळण मार्ग

**प्रकल्प कार्यालयाचे वर्णन** :- गोंदिया शहराच्या पुर्व वळण रस्त्याच्या बांधकामाकरीता भुसंपादन करणे

**समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक, रोजगार, पायाभुत सुविधा, सोयी सुविधा याबाबत व इतर लाभासंबंधात)** :- जनतेला वाहतुकीसाठी व जड वाहतुकीसाठी गावाबाहेरून रस्ते सुविधा उपलब्ध करून देणे जनतेला येण्या-जाण्याची सुविधा उपलब्ध करून देणे पर्यायाने सामाजिक कल्याण व लोकहित साधने.

## अनुसुची - तीन

(पुनर्वसन क्षेत्राचे वर्णन)

मौजा - गोंदिया खुर्द

| अनु.क्र. | सर्वे क्र. | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## अनुसुची -चार

**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

सामाजिक आघात सर्वेक्षण अहवाल निरंक असल्याने पुनर्वसन व पुनर्वसाहत योजना सारांश निरंक आहे तथापी महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियमाच्या तरतुदी लागू होत नाही.

उक्त जमिनीच्या आराखडयाचे भुसंपादित जमिनीचा नकाशा उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, गोंदिया यांच्या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक :- /०६/२०१७

ठिकाण :- गोंदिया

सील

(अभिमन्यु काळे)
जिल्हाधिकारी, गोंदिया